सहकारी साखर कारखान्यांना कर्ज उभारणीसाठी राज्य सरकारची थकहमी ?

आज मंत्रिमंडळ बैठकीत निर्णयाची शक्यता

मुंबई: पुढारी वृत्तसेवा

सहकारी साखर कारखान्यांना एनसीडीसी मार्फत कर्ज उभारणीसाठी राज्य सरकारची थकहमी देण्याचा निर्णय बुधवारी होणा-या मंत्रीमंडळ बैठकीत होण्याची शक्यता आहे. राज्यातील एकूण २१ सहकारी साखर कारखान्यांना कर्जासाठी ही थकहमी उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव राज्य सरकारच्या विचाराधीन आहे.

सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्या दालनात मंगळवारी विविध कारखान्यांच्या अध्यक्षांसोबत या विषयावर बैठक पार पडली. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा थकबाकीचा निर्णय महत्वाचा मानला जात आहे. कारखानदारांसोबत पार पडलेल्या बैठकीनंतर सहकारमंत्री वळसे-पाटील यांनी अर्थमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. बुधवारी पार पडणाऱ्या मंत्रीमंडळ बैठकीत कारखान्यांना थकहमी देण्याबाबत निर्णय होण्याची दाट शक्यता आहे.राज्य सरकारने यापूर्वीही अडचणीतील सहकारी साखर कारखान्यांना कर्जाची उभारणी करण्यासाठी शासकीय थकहमी देण्याची भूमिका घेतली होती.

आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या कारखान्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी मंगळवारी मी एक बैठक घेतली.सगळ्या अडचणीत आसलेल्या कारखान्यांचे प्रस्ताव आम्ही मागवून घेतले आहेत, असे या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सहकार मंत्री वळसे पाटील यांनी सांगितले.

'वैद्यनाथ'ला कर्ज मिळणार का?

■ भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्या वैद्यनाथ कारखान्याला कर्ज मिळणार का? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. आजच्या बैठकीबाबत सहकार विभागाकडून कारखानदारांना दिलेल्या नोटीसीमध्ये पंकजा मुंडे यांच्या कारखान्याचा समावेश नाही.

खानापूरमधील विकासकामांना गती द्या : मुख्यमंत्री

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

सांगली जिल्ह्यातील खानापूर मतदारसंघाच्या विकासासाठी दिवंगत आमदार अनिल बाबर यांनी खूप संघर्ष केला असल्यामुळे त्यांच्या पश्चातही या मतदार संघातील विकासकामांना प्राधान्याने गती द्या, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

सह्याद्री अतिथीगृहात खानापूर विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामांबाबत आयोजित केलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

मुख्यमंत्री म्हणाले, आमदार बाबर यांनी आपल्या मतदारसंघातील विकास कामांसाठी पाठपुरावा केला आहे. त्यांच्या मतदारसंघातील विकास कामांना आपल्याला गती द्यावी लागेल. त्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने आणि सकारात्मक दृष्ट्या कार्यवाही करावी, असेही ते म्हणाले.

विटा येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्याबाबत सकारात्मक आहोत. हे कार्यालय सुरु होईपर्यंत परिवहन खात्यातर्फे आयोजित केला जाणाऱ्या वाहन नोंदणीसह, विविध कामांसाठीची शिबिरांची संख्या दुपटीने वाढवावी. या ठिकाणी नागरिकांची कोणतीही गैरसोय होऊ नये याची दक्षता घ्यावी.

एसटी महामंडळाच्या विटा, खानापूर, आटपाडी, खरसुंडी येथील आगार व बसस्थानकांच्या कामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. विटा येथील आगार आणि बसस्थानकांमधील सुविधा अद्ययावत करण्यात याव्यात. याठिकाणची कामे दर्जेदार आणि वेळेत व्हावीत.

आरोग्य केंद्रांचा आढावा

■ हातनूर येथील ग्रामीण रुग्णालय तसेच या मतदार संघातील विविध गावांतील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्राबाबत या बैठकीत आढावा घेण्यात आला. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्राम योजनेंतर्गत विविध ग्रामपंचातींचे प्रस्ताव, तसेच जलसंधारणाची कामे याबाबतही मुख्यमंत्री शिंदे यांनी संबंधित विभागाला निर्देश दिले.

आरोग्यदायी उपक्रमांनी जिल्हा प्रमुख विजय चौगुलेंचे अभीष्टचिंतन

नवी मुंबई : पुढारी वृत्तसेवा

नवी मुंबई महापालिकेचे विरोधी पक्षनेते तथा शिवसेनेचे (शिंदे गट) जिल्हाप्रमुख विजय चौगुले यांचा वाढदिवस आरोग्यदायी व सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यानिमित्त ऐरोली विभागातील सफाई महिला कर्मचाऱ्यांना भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे ऐरोली सेक्टर-३येथील इंद्रावती हॉस्पीटलमध्ये आरोग्य तपासणी व मोफत ॲजिओग्राफी ॲजिओप्लास्टी शिबिर घेण्यात आले.

नवी मुंबईकरांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून चौगुले यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने इंद्रावती हॉस्पीटलमध्ये तीन डायलिसीस मशिन ओपन हार्ट सर्जरी ओटी आणि नवी मुंबईतील पहिली आधुनिक सुविधायुक्त कार्डियाक ॲब्युलन्स दिली आहे.यावेळी युवासेना प्रदेश कार्यकारीणी सदस्य ममित चौगुले,शुभम चौगुले, इंद्रावती हॉस्पीटलचे डॉ.उमेश तेलतुंबडे, ॲपल हॉस्पीटलचे डॉ.धनोज गपाट,माजी नगरसेवक जगदीश गवते राजू पाटील, आकाश मढवी, संजू वाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

सिडको
शहरांचे शिल्पकार

बोली मागविणारी सूचना

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अंतर्गत एअरपोर्ट सर्व्हिलियन्स रडार (एएसआर - १) करिता प्लॉट डेव्हलपमेंटसहित ढाकळे बेटाशी संपर्क साधता येण्यासाठी जेट्टीची (कॅप्टीव्ह) रचना व बांधकाम कार्य.

सिडको महाराष्ट्र लिमिटेड हे खालील निर्देशित कामांकरिता अशा प्रकारची कामे केलेल्या, सिडको लि. वा केंद्र सरकार वा महाराष्ट्र राज्य शासन व त्यांच्या उपक्रमांकडे योग्य त्या वर्ग व श्रेणीत नोंदणीकृत असलेल्या अनिवार्य पात्रता अर्हतांची पूर्तता करीत असलेल्या अनुभवी प्रस्तावित बोलीदारांकडून द्वी बोली प्रणालीतून (भाग-१ : तांत्रिकी बोली व भाग २ : वाणिज्यिकबोली) ई-टेंडरिंग प्रक्रियेच्या माध्यमातून ऑनलाइन एकत्रित बोली मागवीत आहेत.

१. कामाचे वर्णन : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अंतर्गत एअरपोर्ट सर्व्हिलियन्स रडार (एएसआर-१) करिता प्लॉट डेव्हलपमेंटसहित ढाकळे बेटाशी संपर्क साधता येण्यासाठी जेट्टीची (कॅप्टीव्ह) रचना व बांधकाम कार्य. २. सी. ए. क्र : १०/सिडको/ ईई (एपी-४)/२०२३-२४, **३. बोलीचे मूल्य :** रु. १२१२.३५ लाख (अंदाजे) (जीएसटी वगळता), **४. इरठे :** रु. १२.१२ लाख, **५. नोंदणीकरणाचा वर्ग :** वर्ग आयसी (सिव्हिल), **६. कार्यपूर्तता कालावधी :** ३६५ (तीनशे पासष्ट) दिवस अर्थात १२ (बारा) महिने (पावसाळा समाविष्ट) ज्यामध्ये पुढील कामांचा समावेश असेल : अ) डिझाइन, प्रूफ चेकिंग व त्यांची मंजुरी व वैधानिक क्लीअरन्सकरिता ९० (नव्वद) दिवस, ब) प्रकल्पाचे बांधकाम व सुपूर्ततेकरिता २७५ (दोनशे पंचाहत्तर) दिवस. **७. निविदा प्रक्रिया शुल्क :** रु. २१२४०.०० (१८% जीएसटी समाविष्ट) (नापरतावा).

बोली कार्यक्रमासह बोली दस्तावेज वेबसाइट mahatenders.gov.in वर दि. १४.०३.२०२४ रोजी सायं. ५.०१ वा. उपलब्ध आहेत.

अतिरिक्त मुख्य अभियंता (२)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/६८५/२०२३-२४

एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड
(आधीची एल&टी फायनान्स लि, स्कीम ऑफ अमालगमेशन अंतर्गत एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. शी संलग्न होऊन ज्याची अंमलबजावणी 4 डिसेंबर 2023 रोजी झाली)
नोंदणीकृत कार्यालय: नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177 कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
CIN No.: U65910WB1993FLC060810
शाखा कार्यालय: मुंबई

L&T Finance

तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक ई-लिलावाद्वारे'' ''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा ई-लिलाव करीत आहेत.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/ अनेक)	ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 09.03.2024 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. मायरॉन रॉड्रिग्ज 2. सुनीता रॉड्रिग्ज	मालमत्तेचा पत्ता - निवासी युनिट क्र. B-1604A, सी.एस क्र. 8 वर नवीन कफ परेड प्रकल्पाचा लोढा एन्चेंट (बी विंग) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या 16व्या मजल्यावर 509 चौ.फूट चटई क्षेत्रफळाचे मोजमाप असलेली जागा.. मुंबई शहराच्या नोंदणी जिल्ह्यातील सॉल्ट पान गाव/विभागातील न्यू कफ परेड, वडाळा, समोर. इमॅक्स डोम, वडाळा (पूर्व) मुंबई-400 022, एका कार पार्किंगच्या जागेसह.	MUMHL18002144	28 फेब्रुवारी 2024	रु.11,81,620/-	रु. 9,847,289.04/-	रु.1,18,16,200/-	सार्वजनिक सुट्टी सोडून सकाळी 10:00 ते संध्याकाळी 6:30 वाजेपर्यंत भेटीची वेळ निश्चित करून घ्यावे	19.04.2024 सकाळी 10 ते संध्याकाळी 5:30 पर्यंत

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना 18/04/2024 रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे 19/04/2024 रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे 20/04/2024 भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधू शकतात उदा., **नाव - हरिलाल गुप्ता, संपर्क क्रमांक 8080302861, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड, कार्यालय: 6वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट क्रमांक 177, कलिना , सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098,आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड, कार्यालय: 6वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट क्रमांक 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकार/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी, कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 13.03.2024
ठिकाण: मुंबई

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड

नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

महाराष्ट्र शासन

कुशल महाराष्ट्र, रोजगारक्षम महाराष्ट्र

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

१०० महाविद्यालय कौशल्य विकास केंद्राचा

उद्घाटन सोहळा

दिनांक: १३ मार्च २०२४ | वेळ: स. ११:०० वाजता
ठिकाण: मेघदूत बंगला, मुंबई

ऑनलाईन पद्धतीने

मार्गदर्शक
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

शुभहस्ते
देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

विशेष उपस्थिती
अजित पवार
उपमुख्यमंत्री

संकल्पना
मंगल प्रभात लोढा
मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता

नाविन्यपूर्ण उपक्रम

- स्वामी विवेकानंद आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास प्रबोधिनी.
- संत गाडगेबाबा स्वच्छ भारत कौशल्य प्रबोधिनी.
- ग्रामीण कौशल्य विकास केंद्र.
- पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावे.
- महिलांसाठी स्किल ऑन व्हील.
- औद्योगिक प्रशिक्षण संस्था आधुनिकीकरण.
- छत्रपती शाहू महाराज करिअर मार्गदर्शन शिबिर.
- इंडस्ट्रिअल मीट - १,१७५ कंपनीबरोबर सामंजस्य करार.
- ६,८४,००० नवीन रोजगार उपलब्ध होणार.
- महापुरुषांचे कौशल्य विचार पुस्तकाचा अभ्यासक्रमात समावेश.
- महिलांसाठी स्टार्ट अप मध्ये ३०% रक्कम राखीव.
- महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाची सुरुवात.

डीजीआयपीआर/२०२३-२०२४/९८१४

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन